## पोलिसांच्या तपासाला आधुनिक जोड

**पुणे ।** गुन्हेगारीच्या बदलत्या स्वरूपाला तोंड देण्यासाठी पोलिसांनी आता पारंपरिक तपास पद्धतीबरोबरच आधुनिक तंत्रज्ञानाची जोड देणे आवश्यक आहे, असे प्रतिपादन राज्याच्या पोलिस महासंचालक रश्मी शुक्ला यांनी केले. पुणे येथील पोलीस संशोधन केंद्रात पार पडलेल्या केंद्रीय गृहमंत्री उत्कृष्ट अन्वेषण पदक प्रदान सोहळ्यात त्या बोलत होत्या. या कार्यक्रमाला अतिरिक्त पोलिस महासंचालक सुनिल रामानंद, पुणे पोलिस आयुक्त अमितेशकुमार, पिंपरी चिंचवडचे पोलिस आयुक्त विनयकुमार चौबे यांच्यासह अन्य वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते.


# देशदूत

शिल्पकार विकासाचा...








इंटरनेट आवृत्ती www.deshdoot.com | धुळे | वर्ष २८ । अंक २३५ । रविवार, दि.१५ जून २०२५ । पाने - ८ | किंमत ₹ ५ | मोबाईल आवृत्ती वाचा व वर








# खान्देशात विजांच्या कडकडाटांनी घेतला तिघांचा बळी

## खेडगावला आई-वडिलांसमोरच मुलाचा मृत्यू



**बांबरुड (राणीचे), ता.पाचोरा ।** बांबरुड राणीचे येथून जवळच असलेल्या व पाचोरा-जळगाव रोडवरील खेडगाव नंदीचे येथे १४ जून रोजी खेडगाव नंदीचे येथील रहिवासी मोहित जगतसिंग पाटील (वय २५) मोहाडी रस्त्यावरील स्वत:च्या शेतात आई, वडिलांसमवेत मक्याची लागवड करत असताना दुपारी तीन साडेतीनच्या दरम्यान विजेचा कडकडाट सुरु असतानाच अचानक वीज अंगावर पडून आई-वडिलांच्या डोळ्यासमोर एकुलत्या एक मुलाचा अंत झाला. यामुळे आई-वडिलांनी एकच हंबरडा फोडला. या घटनेमुळे परिसरात पसरले असून सर्वत्र हळहळ व्यक्त केले जात आहे.

## पुरनाडला शेतकऱ्यावर कोसळली वीज



**मुक्ताईनगर ।** तालुक्यातील पुरनाड गावात आज १४ रोजी सायंकाळी सुमारे ५ वाजेच्या सुमारास निसर्गाचा दुर्दैवी घटना घडली. ४४ वर्षीय शेतकरी शांताराम शंकर कठोरे यांचा शेतात काम करत असताना जोरदार विजेच्या धक्क्याने जागीच मृत्यू झाला. यामुळे पूरनाड परिसरावर शोककळा पसरली आहे.

शांताराम कठोरे हे शेतकरी नेहमीप्रमाणे शेतात कामासाठी गेले होते त्यानंतर आज सायंकाळी अचानक


पान २ वर


## मोलगीत घरावर वीज पडून बालिकेचा मृत्यू

**नंदुरबार ।** मोलगी (निंबीपाडा) ता.अक्कलकुवा येथे आज दि.१४ जून रोजी सायंकाळी पाच वाजेच्या सुमारास घरावर वीज पडून १० वर्षीय बालिकेचा मृत्यू झाल्याची घटना घडली. नंदुरबार जिल्ह्यात गेल्या दोन दिवसांपासून मान्सून सक्रिय झाला आहे. वीजांच्या कडकडाट आणि ढगांच्या गडगडाटासह जिल्हाभरात कमी-अधिक प्रमाणात पावसाला सुरुवात झाली आहे. दरम्यान, आज दि.१४ जून रोजी सायंकाळी ५ वाजेच्या सुमारास मोलगी (निंबीपाडा) येथील दिलीप टेडगा वसावे यांच्या राहत्या घरावर वीज पडल्याने त्यांची १० वर्षाची मुलगी माया दिलीप वसावे हिचा मृत्यू झाला. तिच्या मृतदेहाचे मोलगी येथील ग्रामीण रुग्णालयात शवविच्छेदन करण्यात आले. या घटनेमुळे परिसरात हळहळ व्यक्त करण्यात येत आहे.

## थोडक्यात



### मोदी चार दिवस विदेश दौऱ्यावर

**नवी दिल्ली ।** पंतप्रधान नरेंद्र मोदी कॅनडातील कनानास्किस येथे होणाऱ्या जी-७ शिखर परिषदेत सहभागी होणार आहेत. कॅनडाचे पंतप्रधान मार्क जे. कार्नी यांनी पीएम मोदी यांना या परिषदेत सहभागी होण्यासाठी निमंत्रण दिले आहे. त्यासाठी पीएम मोदी १६ ते १७ जून दरम्यान कॅनडाच्या दौऱ्यावर असतील. विशेष म्हणजे ते जी-७ शिखर परिषदेत सलग सहाव्यांदा सहभाग घेत असल्याचे परराष्ट्र मंत्रालयाने म्हटले आहे. या शिखर परिषदेत पीएम मोदी जी-७ देशांचे नेते उपस्थित राहणार आहे.



### कच्चे तेल भडकले

**नवी दिल्ली ।** इस्त्रायल-इराणमध्ये संघर्ष वाढला आहे. यामुळे मध्य पूर्वेतून तेल निर्यातीबाबत अनिश्चितता निर्माण झाली आहे. परिणामी कच्च्या तेलाचे दर भडकले आहेत. ब्रेंट क्रूड फ्युचर्सचा दर ४.८७ डॉलरने म्हणजेच ७ टक्के वाढून प्रति बॅरल ७४.२३ डॉलरवर स्थिरावला. काल सुरुवातीला तो सुमारे १३ टक्के वाढून ७८.५० डॉलरवर गेला होता. यूएस वेस्ट टेक्सास इंटरमीडिएट क्रूडचा दर ४.९४ डॉलर अथवा ७.२६ टक्क्यांनी वाढून प्रति बॅरल ७२.९८ डॉलरवर बंद झाला. बॅलिस्टिक क्षेपणास्त्र कारखाने आणि प्रमुख लष्करी कमांडरना लक्ष्य केले. त्यानंतर काही वेळातच, इराणने तेल अवीवमधील इमारतींवर क्षेपणास्त्र हल्ला केला. इराणच्या नॅशनल ऑईल रिफायनरी आणि डिस्ट्रिब्युशन कंपनीने म्हटले आहे की, तेल शुद्धीकरण आणि तेलसाठे ठिकाणे अबाधित आणि पूर्णपणे कार्यरत आहेत.

## राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये सत्तेत सहभागी होण्यासाठी दोन मतप्रवाह

# आमदार तयार, खासदारांचा नकार

## मोठ्या साहेबांच्या अटीमुळे निर्माण झाला पेच

**मुंबई ।** आगामी काळात राज्यात व देशात सत्ता बदल होण्याची शक्यता नसल्याने राष्ट्रवादी काँग्रेस (शरद पवार) गटातील आमदारांना सत्तेचे वेध लागले आहे. भाजपा व महायुतीसोबत सूत जुळवून सत्तेत सहभागी व्हावे, असे अनेक आमदारांचे मत आहे. तर सत्तेत सहभागी होवू नये असा खासदारांचा सूर आहे. त्यातच भाजपाशी कोणत्याही पद्धतीने युती करु नये असा दम शरद पवारांनी भरल्याने राष्ट्रवादी काँग्रेस (शरद पवार) गटात चलबिचल सुरु आहे. शिवसेनेनंतर राज्यात राष्ट्रवादी काँग्रेस पक्षात पण उभी फूट पडली होती. अजितदादांच्या नेतृत्वातील गटाने सत्तेची कास धरली तर दुसरीकडे शरद पवारांचा गट विरोधी बाकांवर बसला. पण या गटातील अनेक आमदारांना आता सत्ता खुणावू लागली आहे. त्यांना विरोधी बाकांची ऊब मानवेना. आता त्यांना जनता आणि कामे आठवली आहेत. त्यांनी सत्तेत जाण्याचा सूर आळवला आहे. आपण सत्तेत भागीदार असायला हवे



अशी मागणी या आमदारांनी केल्याची माहिती सूत्रांनी दिली आहे.पण भाजपासोबत जायचे नाही या साहेबांच्या अटीमुळे मोठा पेच निर्माण झाला आहे.त्यामुळे पवार गटात पुन्हा दोन मतप्रवाह तयार झाले आहेत.

राज्यात स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीपूर्वी दोन्ही ठाकरे बंधु एकत्र येण्याची चर्चा रंगात आहे. अर्थात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी नेहमीप्रमाणे अचूक टायमिंग साधले आहे. तरीही आशेची धुकधूक कायम आहे. दुसरीकडे दोन्ही


पान २ वर


### भाजपाशी युती नकोच!

दरम्यान शरद पवार यांनी भाजपासोबत जाण्यास नकार दिला आहे. भाजपासोबत जाण्यास शरद पवार तयार नसल्याचे समोर येत आहे. भाजपासोबत युती करायची नाही असे पवारांचे मत असल्याची माहिती सूत्रांनी दिली आहे. त्यामुळे आता आमदारांसमोर मोठा पेच निर्माण झाला आहे. तर दुसरीकडे खासदारांनी मात्र पवारांच्या भूमिकेला पाठिंबा दिल्याची माहिती सूत्रांनी दिली आहे.

### मतदारसंघातील कामांच्या तक्रारी

मतदारसंघातील कामे होत नसल्याने आमदार अस्वस्थ झाले आहेत. आपण सत्तेत जायला हवे अशी आग्रही मागणी या आमदारांनी शरद पवार यांच्याकडे केल्याची माहिती आहे. मतदारसंघातील कामे आणि त्यांना मिळणारा निधी यावरून त्यांनी तक्रारीचा सूर आळवला आहे. सत्तेत असल्यावर निदान कामं तरी करता येईल अशी भूमिका त्यांनी मांडली. तर दुसरीकडे खासदार शरद पवारांच्या पाठीशी असल्याचे दिसून आले. पवार जी भूमिका घेतील, त्याला त्यांचा पाठिंबा असल्याचे सूत्रांनी सांगितले. मात्र आमदारांना सत्तेत सहभागी होण्याचे वेध लागले आहे.



## सामंत यांच्या आश्वासनानंतर बच्चू कडूंचे आंदोलन मागे

**मोझरी ।** प्रहारचे अध्यक्ष बच्चू कडू यांचे उपोषण अखेर सातव्या दिवशी सुटले. गेल्या सहा दिवसांपासून त्यांचे अन्नत्याग आंदोलन सुरू होते. त्यांच्या आंदोलनाला राज्यभरातून पाठिंबा मिळत होता. कालपासून सरकार त्यांनी आंदोलन मागे घ्यावे म्हणून प्रयत्न करत होते. आज मंत्री उदय सामंत हे आश्वासनाचा खलिता घेऊन मोझरीत दाखल झाले. त्यांनी सरकारची बाजू मांडली. त्यानंतर बच्चू कडू यांनी उपोषण सुटल्याचे जाहीर केले. पण त्याचवेळी हे आंदोलन मागे घेतले नाही तर पुढे ढकल्याचे त्यांनी सरकारला बजावले. जर सरकारने दगाफटका केला, विश्वासघात केला तर मंत्रालयात घुसून प्रहार स्टाईलने आंदोलन करण्याचा इशारा सुद्धा त्यांनी दिला. आम्ही सांगू नागपूरला आणि आंदोलन करू मुंबईला. सरकारला छत्रपती शिवाजी महाराजांचा गनिमी कावा दाखवू असे सूचक इशारा त्यांनी उपोषण सोडताना दिला.

सरकारने मागण्या मान्य करण्याचे आश्वासन दिले आहेत. काही तांत्रिक बाबींची पुर्तता कराव्या लागतात. सरकारला आम्ही २ ऑक्टोबरपर्यंत मुदत देतो. जर तोपर्यंत मागण्या मान्य करून त्यावर योग्य ती अंमलबजावणी केली नाही तर आम्ही मंत्रालयात घुसू. तिथे आंदोलन करू असा इशारा बच्चू कडू यांनी दिला. त्यांनी सरकारला डेडलाईन दिली आहे. २ ऑक्टोबर रोजी गांधी जयंती आहे. त्यादिवशी भगतसिंह यांच्यासारखे आंदोलन करू असा सज्जड दमच कडू यांनी भरला.

# तीन महिन्यात अहवाल सादर करा!

### उच्चस्तरीय समितीची स्थापना

एअर इंडिया विमानाच्या दुर्घटनेनंतर केंद्र सरकारने एक उच्चस्तरीय चौकशी समितीची स्थापना केली आहे. ही समिती ३ महिन्यात त्यांचा रिपोर्ट सादर करेल. गृह सचिवांच्या अध्यक्षतेखालील या समितीत केंद्र आणि राज्य सरकारचे संयुक्त सचिव स्तरावरील अधिकाऱ्यांचा समावेश असेल. समिती हा अपघात नेमका कसा घडला त्यामागची कारणे तपासेल. सध्याची एसओपी आणि दिशा निर्देशांचा आढावा घेईल आणि भविष्यात अशा दुर्घटना रोखण्यासाठी काय पाऊले उचलावी लागतील याची शिफारस करतील.

## उच्चस्तरीय समितीला तपासासाठी डेडलाईन



अहमदाबाद विमान अपघात


**अहमदाबाद ।** १२ जून रोजी अहमदाबादमध्ये भीषण विमान अपघात घडला. या अपघातात २७४ हून अधिक लोकांचा जीव गेला. या दुर्घटनेतर शनिवारी पहिल्यांदाच नागरी उड्डाण मंत्रालयाने पत्रकार परिषद घेतली. एअर इंडिया फ्लाईट एआय १७१ ने अहमदाबाद विमानतळावरून उड्डाण घेतल्यानंतर केवळ ६५० फूट उंचीवर पोहचू शकले. ज्यानंतर हे विमान वेगाने खाली आले असे मंत्रालयाने सांगितले. या पत्रकार परिषदेत नागरी उड्डाण मंत्रालयाचे सचिव समीर कुमार सिन्हा म्हणाले की, विमानाने उड्डाण घेतल्यानंतर केवळ ६५० फूट उंची गाठू शकली. त्यानंतर हे विमान खाली येऊ लागले. पायलटने दुपारी १.३९ वाजता एटीसीला मे डे कॉल दिला होता. एक मिनिटांनंतर विमान मेघानीनगर भागातील मेडिकल कॉलेज परिसरात कोसळले. या दुर्घटनेआधी हे विमान पॅरिस-दिल्ली-अहमदाबादला विना कुठल्याही तांत्रिक समस्येशिवाय पोहचले होते असेही त्यांनी सांगितले.

## इस्त्रायलने भारताची मागितली माफी

**नवी दिल्ली ।** भारताच्या आंतरराष्ट्रीय सीमांचा चुकीचा नकाशा पोस्ट केल्याबद्दल इस्त्रायलच्या लष्कराने माफी मागितली आहे. ही पोस्ट इस्त्रायलने इराणवर केलेल्या हवाई हल्ल्यानंतर केली होती. हा नकाशा केवळ प्रदेशाचे दृश्यात्मक प्रतिनिधित्व म्हणून वापरण्यात आला होता, असा खुलासाही इस्त्रायलने केला आहे. इराणला जागतिक धोका दाखवण्याच्या उद्देशाने नकाशा केला पोस्ट इराणवर केलेल्या हल्ल्यानंतर इस्त्रायलने इराणला जागतिक धोका म्हणून दाखवण्याच्या उद्देशाने हा नकाशा पोस्ट केला होता. या नकाशात नकाशात जम्मू आणि काश्मीर पाकिस्तानचा भाग असल्याचे दाखवण्यात आले.


## भावपूर्ण श्रद्धांजली

स्व. खा. मुकेशभाई पटेल यांच्या पवित्र स्मृतीस विनम्र अभिवादन



### स्व. खा. मुकेशभाई रसिकलाल पटेल

(२४ सप्टेंबर १९५४ - १५ जून २००२)

आपल्या प्रेरणादायी कर्तृत्वामुळे आम्हाला आजही स्फुर्ती मिळते. संस्थेचे अध्यक्ष आमदार अमरिशभाई पटेल व सह-अध्यक्ष भूपेशभाई पटेल यांच्या मार्गदर्शनाखाली श्री विलेपार्ले केळवणी मंडळ हे भारताच्या आधुनिक शैक्षणिक विकासाचे मॉडेल बनले आहे. शहरासह ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना संस्थेमार्फत रोजगाराच्या संधी मोठ्या प्रमाणात उपलब्ध केल्या. जागतिक स्पर्धेत विद्यार्थी सर्वत्र यशस्वी होण्यासाठी संस्थेने मुंबई, बेंगलोर, हैद्राबाद, शिरपूर, इंदोर, न्यू मुंबई, धुळे, चंदीगड, अहमदाबाद, नोयडा, भुवनेश्वर, नागपूर व शिरपूर येथे एस.व्ही.के.एम. संचलित तपनभाई मुकेशभाई पटेल मेमोरियल हॉस्पिटल, मेडीकल कॉलेज व रिसर्च सेंटर अशा शिक्षणाची विविध दालने सुरु केली. आपल्या स्वप्नपूर्तीकडे यशस्वी वाटचाल सुरु आहे.

''आपल्या कार्याबद्दल आम्हाला सार्थ अभिमान आहे.''

अभिवादक

- श्री विलेपार्ले केळवणी मंडळ, मुंबई
- दि शिरपूर एज्युकेशन सोसायटी, शिरपूर
- मुकेशभाई आर. पटेल बॉईज ॲण्ड गर्ल्स मिलीटरी स्कूल ॲण्ड ज्यु. कॉलेज (सायन्स), तांडे ता. शिरपूर
- मुकेशभाई आर. पटेल स्कूल (सी.बी.एस.ई.), तांडे ता. शिरपूर

टीप : आर.सी.पटेल मेन बिल्डींग, राजगोपाल चंदूलाल भंडारी हॉल, शिरपूर जि.धुळे दि.: १५/०६/२०२५, सकाळी ९.३० ते ९.५० पर्यंत श्रध्दांजली कार्यक्रम होईल.


### केळी भाव

नवती (१) : 2200
नवती (२) : 2000

### मिरकिली




# मनसेसोबतच्या युतीबाबत शेवटपर्यंत आशावादी

## दोन्ही भाऊ एकत्र यावे ही शिवसैनिकांची इच्छा-खा.संजय राऊत

**मुंबई ।** मुंबईत मराठी माणसाला न्याय मिळावा, मराठी माणूस मुंबईत टिकावा, त्यांचे स्थान आणि हक्क मिळावे ही शिवसेनेची तसेच राज ठाकरे यांचीही भूमिका आहे. त्या भूमिकेतून एकत्र येण्याचा विचार राज ठाकरे यांनी मांडला आणि उद्धव ठाकरेंनी त्याला पाठिंबा दिला आहे. त्यामुळे मराठी माणसाच्या एकत्रीकरणाठी आम्ही शेवटपर्यंत आशावादी आहोत. शेवटच्या मिनिटापर्यंत आम्ही या भूमिकेत राहू, असे प्रतिपादन शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे नेते संजय राऊत यांनी शनिवारी येथे केले. त्यामुळे दोन्ही बंधू एकत्र येण्याच्या चर्चेला पुन्हा हवा मिळाली आहे. दोन ठाकरे बंधुंच्या युतीची चर्चा चालू असतानाच दोन दिवसांपूर्वी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि



राज ठाकरे हे वांद्रे येथील एका हॉटेलमध्ये भेटले. या भेटीत दोघांमध्ये नेमकी चर्चा काय झाली हे उघड झाले नसले तरी त्यामुळे उद्धव ठाकरे आणि राज ठाकरे हे पुन्हा एकत्र येण्याच्या प्रयत्नांना खीळ बसणार असल्याचे बोलले जात आहे. या पार्श्वभूमीवर आज प्रसार माध्यमांच्या प्रतिनिधींशी बोलताना राऊत यांना फडणवीस-राज भेटीबाबत विचारले असता राऊत म्हणाले, ते दोघेही वेगळ्या विषयासंदर्भात भेटले असू शकतात. त्यामुळे वेगळ्या शंका घेऊन मूळ मुद्यांना बगल देणे योग्य नाही. फडणवीस हे गौतम अदानी किंवा मुंबईतील उद्योगपती, बिल्डर यांचे समर्थक आणि मुख्य हस्तक आहेत. त्यांनी कितीही भेटीगाठी घेतल्या तरी फरक पडत नाही. मुंबई ही परप्रांतीय उद्योगपती गिळत असतील आणि त्याला भाजप, शिंदेसारखे लोक मदत करीत असतील तर सर्व मराठी नेत्यांनी, महाराष्ट्रभिमान्यांनी एकत्र यावे ही शिवसेनेची भूमिका कायम आहे. भाजप आणि त्यांचे नेते हे मराठी माणूस आणि महाराष्ट्राचे शत्रू आहेत हे लोकांनी ठरवले आहे, असा आरोप करत संजय राऊत यांनी राज ठाकरेंना वाढदिवसाच्या शुभेच्छा दिल्या.